## × × प्रकरण तिसरे × ×

## ।। "डोळे" मधील कवितांचे स्वरूप ।।

# ::: प्रकरण तिसरे :::

## xxx "डोळे" मधील कवितांचे स्वरूप xxx

आधुनिक कवितेत आपण पाठीमागे राम गोसावी यांचे स्थान पाहिले. आता आपल्याला त्यांच्या 'डोळे' आणि 'अंधारबन' या दोन काव्यसंग्रहांचा अभ्यास करावयाचा आहे. 'डोळे' हा राम गोसावींचा संग्रह भावार्थ आहे. हा संग्रह डिसेंबर १९७५ मध्ये प्रसिद्ध झाला. हा रसिकांनी या संग्रहाचे मनापासून कौतुक केले. त्याला महाराष्ट्र सरकारने ७६-७७ चे कवी केशवसुत पारितोषिक देऊन गौरविण्यात केले. या संग्रहात एकूण ६५ कविता आहेत. त्यात शोककविता, प्रेमकविता, निसर्गकविता, भक्तिपर कविता, सामाजिक कविता अशा इ. कविता आहेत. त्यात बहुधा दुःखाच्याय कविता जास्त प्रकट झाल्या आहेत. दृष्टी गेल्यामुळे कवीने आपले अंधारमय जीवन या कवितांतून समर्थपणे उभे केले आहे. 'डोळे' मधील कवितांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

१) "डोळे" मधील कवितांचे वर्गीकरण -

अ) शोककविता -

'डोळे' 'ताटातूटी' 'उंट' 'अंधार' 'दृष्टी' 'निद्रिस्त तळयात' 'अंधाराच्या थेंबामध्ये' 'आभास' 'विळखा' 'कळत न कळत' 'सापडेना' 'तुझिया एका' 'अरे माझ्या मना' 'आता सारे निवांत' 'माझी कळ' 'अखेरीस' 'एखादयाचे नशीब' 'माझ्या उध्वस्त समाधीवर' 'अतृप्त' 'निरोप' 'मातीमोल जीवन' 'चालतो एकला' 'व्यर्थ कासावीस' 'विरह' 'कधी निवतील' 'चुकले पाखरं' 'कित्येकदा' 'जायचे होते खूप दूर' 'सांजवेळ' 'अंधारगाणी' 'वणवा' 'शब्दगंध' 'यात्रा' 'स्वरूप' 'उजाड' या दुःखमय कविता आहेत.

'डोळे' या कवितेत कवीने डोळे गेलेल्याचे दुःख व्यक्त केले आहे. जेव्हा डोळयामधले निळे पक्षी हरवतात तेव्हा सर्व काही संपले आहे. याची तीव्र जाणीव कवीमनाला होते. त्याच काळीज प्रेशर कुकरमधल्या

वापेसारखे शब्दरम व्हायला तडफडत आहे. त्यांना वाटते ही अर्धी-मुर्धी गाथा प्रवाहात बुडवावी. पण इंद्रायणीनदी रागावून बोलली.

"सारे भोग भोगून ये, मग माझ्या कुशीत ये" १

आणि कुणीतरी रस्त्यात म्हणाले,

"काय साब, अशी दोनीबी
डोळ्यांना दिसत नाय? लई वंगाळ बगा.
असं होण्यापरास पटाकदिशी परान
गेलेला बेस बक्का." २

४ जुलै १९६५ ........ ही निदान त्यांच्यापुरती एक भीषण संध्याकाळ होती. रस्त्यातून चालताना एकदम धमकल्या डोळ्यांपुढे काजव्यांच्या ओळी आणि वाटले, आकाशाचे प्रकाशछत्र खाली कोसळून वीजेचे घर बंद पडले. सगळं शहर अंधारात बुडून गेले आणि वाटले, आता आपलं संपल आहे. हॉस्पिटल, डिटॅचमेंट रेटिना, अॅन्टी ट्रिटमेंट, ऑपरेशन्स, औषधं, इंजेक्शन्स, सर्व काही आठवलं आणि दु:ख, छळ, असह्य यातना येथूनं दु:खसुद्धा एक खिळाभर कमी असेल. पिसाटलेले मन, झोपेच्या गोळ्या आणि पायवा मजला आठवला आणि त्यावरून उडी टाकावी असे वाटले. पण अंतरात कुणीतरी दटावलं "शोभत का हे तुला?" संसार फुलविणारे तिचे हात आणि स्वच्छंदी पाखराचे निष्पाप डोळे याची प्रतारणा? लगेच कवी देवाला क्षमा मागतो - मी राहतो आता एका अनोळखी ध्रुवावर की, जिथे बारा महिने रात्र असते आणि दिवस रात्रीत बुडाल्यासारखा असतो. कधी कवी असतो भ्रष्ट गागारीन काळ्याभोर ढगात फसलेला, तर कधी होतो एस्किमो, बर्फाच्या घरात पुरलेला, तर कधी असतो पेटलेला फिलॅमेंट दुधी बल्बमधला. अशी छळणारी अंधार-प्रकाशाची भासलेली रूपे अनेक प्रकारची आहेत. आणि शेवटी पत्नीला म्हणतो-

"आता तूच काठी तूच दिवा
तुझा समर्थ हात हाती हवा" ३

अशी प्रेममय मागणी करतो.

"ताटातुटी' या कवितेमध्ये डोळ्यातले निळे पक्षी निघून जातात आणि वैराण रेतीत शापित शिंपून माडाच्या वनी मनीचे चांदणे माळून व्यथित व्याकुळ घरटे मोकळे होऊन कवीच्या मनाला वेदना होतात आणि डोळ्यात ताटातुटी होते, हे स्पष्ट केले आहे.

'उंट' ही कविता मनाला विषण्णता आणणारी आहे. कवीने स्वत:ला उंट संबोधले आहे. त्याला पायाखाली सगळीकडे काळे वाळवंट दिसते. म्हणून कवी म्हणतो -

"दूरवर कुठे तरी
हिरवी राई
झुलते माड
एखादीच थंडगार पाण्याची ओंजळ
एखादया अभाग उंटासाठी" ४

'अंधार' या कवितेमध्ये कवीने तळयातल्या अंधाराला तळं आणि स्वत:ला भुंगा संबोधला आहे.

"तळयात अंधार
अंधारात तळं
तळयात निळं
मेलेलं कमळ
मेलेल्या कमळात
तडफडतोय भुंगा" ५

अशी घोर निराशा येथे व्यक्त केली आहे. ही निराशा मनाला विषण्णतेने दाटून येते.

'दृष्टी' या कवितेमध्ये कवीची दृष्टी निघून जाते. त्याची खंत कवी व्यक्त करून दृष्टीला म्हणतो - माझ्या मनात मोरपिसे खोऊन मी क्षणभर सावध नसताना तू अचानक निघून गेलीस आणि माझ्या बफोळलेल्या चिरनिद्रिस्त डोळेडोहात पारदर्शक स्वप्नांच्या हातांनी तुझ्या आठवणीचे चंद्रतुकडे मी शोधत आहे. असे व्यक्त केले आहे.

'निद्रिस्त तळ्यात' या कवितेत तळ्याचे जीवन म्हणजे निद्रिस्त आहे. शेवाळलेल्या पाण्याला कवीने निद्रिस्त तळ्याची उपमा दिली आहे. बेसूर स्वरात बेडकांची गाणी, रातकिड्याची किरकिर, काजव्यांची भिरभिर ऐकू येते. झपाटलेल्या वाऱ्याचा आवाज ऐकू येतो. वठलेल्या बाभळीवर फडफडणारा वाघूळ कवी स्वत:लाच म्हणतो. कवीला सर्व जग उदास वाटते. त्यामुळे व्याकुळ होऊन तो मुक्तीची वाट पहात आहे. कवी डोळ्यांना सोनपहाट म्हणतो. ही हरवलेली सोनपहाट माझ्या क्षितीजावर कधी उमटेल हे प्रकट होते.

'अंधाराच्या थेंबामध्ये' या कवितेत हळुवार अंत:करणाचा हा भावार्थ कवी भिजलेल्या डोळ्यांनी भावफुलांची नाजुक लेणी खोदीत बसला आहे. त्याला जगण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. जीवन जगण्याची इच्छा होते. अंधाराच्या थेंबामधूनच त्याला पहाटलेली धूसर गाणी ऐकू येतात. आणि यातूनच सृष्टी साजरी होऊन त्याचे हळूच चुंबन घेऊन जाते. म्हणून कवी म्हणतो विश्वसागरात –

"माझे मी-पण
जाते बुडुनी" ६

'आभास' या कवितेमध्ये कवीला सारे आभास वाटते. सर्व जग खरे आहे का नुसता अंधाराचा भास होतोय म्हणून कवी म्हणतो –

"सारे जग झगमगणारे
तू फक्त काळोखात बुडणारा" ७

असा भास व्यक्त केला आहे.

'विळखा' या कवितेत कवी म्हणतो जेव्हा चंद्र, चांदण्या, फुले, गंध हे सर्व होते, स्वप्ने हसत होती आणि गात्रे सुखावत होती. तेव्हा कवीच्या मनाला कळले नव्हते की, आपल्यावर काळोखाचा क्रूर विळखा पडणार आहे. श्वास कोंडून स्वप्ने, मनिषा, आशा, इच्छा या सर्वांचा चूरचूर होणार आहे. असे व्यक्त झालेले दिसते.

'कळत न कळत' या कवितेत कवीला वाचायला दिलेले पुस्तक त्याने हातात घेतले आणि डोळ्यापुढे अप्सरा उभी रहावी तसे क्षणभर वाटले. दृष्टी नसल्यामुळे त्याला ते पुस्तक वाचता आले नाही. त्या पुस्तकावर असहाय्यपणे कवीची थरथरती बोटे फिरत राहिली. आणि कळत नकळत त्या पुस्तकाच्या गुळगुळीत पानावर कोरड्या डोळ्यातून अनावर होऊन दोन थेंब कोसळले. असे स्पष्ट केले आहे.

'सापडेना' या कवितेमध्ये कवी सुखासाठी धावतो आहे. असे दिसते. पण ते सुख सापडेना. म्हणून कवी दुःखी होऊन म्हणतो -

" धावता धावता
फाटले पाऊल
सुखाचे राऊळ
सापडेना" ८

हे दुःख व्यक्त केले आहे.

'तुझिया एका'...... या कवितेत कवीने झाड, पत्नी, समुद्र यांचे वर्णन केले आहे. कवी उदास होऊन झाडाला म्हणतो तुझ्या एका फांदीवरती प्रमत्त झुलतो हिरवा स्वप्नपिसारा. तुझ्याच दुस-या फांदीवरती उदास झुरतो स्वप्नभंगला शून्य पसारा म्हणजे कवी आहे. पत्नीला म्हणतो तुझ्याच एका डोळयामधून माणुसकीची अमृतधार झुळझुळ वाहत आहे. आणि दुस-या डोळयामधून पिशुनतेचा लाल विखार धगधग पेटतो. तुझिया एका लाटेवरती पांढरा जहाजपक्षी ऐटीत झुलतो. तुझ्याच दुस-या लाटेवरती वादळवेडे फुटके गलबत गिरक्या घेत आहे. हे वादळवेडे फुटके गलबत म्हणजे कवी आहे. असे दुःख व्यक्त होते.

'अरे माझ्या मना' या कवितेत कवी स्वतःच्या मनाला म्हणतो दुःख विसरून गर्दीत घुसलो आणि एकरूप झालो. हास्यकल्लोळात सर्व जग बुडाले तरी अंतरीची आग विझेना. चंचल लहरी समजून मनाचा वैरी भासतो हे दुःख व्यक्त झाले आहे.

'माझी कळ' यामध्ये सुद्धा हेच दुःख व्यक्त केले आहे. कळ म्हणजे कवीचे दुःख आहे. कवी म्हणतो -

"फांदीवर वसंत
हसलाच नाही
कळीला प्रकाश
भेटलाच नाही" ९

कळी म्हणजे कवी आहे. माझे दु:ख तुला समजलेच नाही.

'आता सारे निवांत' मध्ये अंधार होऊन सर्व निवांत आहे. अंधार म्हणजेच काळा शांत डोह आहे. त्या काळया शांत डोहात विसावे चांदणी निळया स्वप्नछायेत चांदणी म्हणजे कवी आहे. तृप्तीचे पंख म्हणजे कवीच होय. मिटलेली कळीत म्हणजे जागवी मिलिंद गंधमय पहाट. ओलावलेल्या कवीच्या पापणीत विझलेल्या स्वप्नांची फुलवात जळत आहे.

'अखेरीस' या कवितेत कवी म्हणतो कोणतीही वस्तु कितीही जपली तरी ती शेवटी नष्ट होते तसीच मानवाचे सुद्धा असेच आहे. म्हणून कवी म्हणतो -

"मानवी ही काया मायारुप छाया
जाईल विल्या अखेरीस" १०

मानवी ही काया अखेरीस विलीन होते. असे स्पष्ट केले आहे.

'एखाद्याचे नशीब' या कवितेत कवीच्या नशीबाचे दु:ख आहे. जेव्हा जाळे पसरले तेव्हा पाखरे उडून गेली. बी पेरण्याच्या वेळेस पाऊस संपला होता. आणि चित्रासाठी रंग जमवले तेव्हा काळोख फक्त उरला होता. कवीच्या नशीबात काहीच नव्हते.

'माझ्या उध्वस्त समाधीवर' या कवितेमध्ये कवीचे सर्व जीवन काळोखा मुळे उध्वस्त झाले आहे. त्याला वाटते आपण समाधी घेतली आहे. त्याचा त्याला विरळ वाटतो आणि पत्नीला म्हणतो -

"माझ्या उध्वस्त समाधीवर
पसरावी तुझी सावली" ११

'यात्रा' या कवितेत कवीने आपले दु:ख व्यक्त केले आहे. त्यला थंडी वा-याचे, उन्हाचे भय नाही. पायाला फळसाची पाने बांधून

पेटलेली राने तुडवत आहे. त्याचं मन यांत्रिक होऊ पाहत आहे. ख-या योगासाठी ही बिकट वाट कवीच्या अंधारमय जीवनाच्या वाटचालीतली बनावट यात्रा आहे.

'अतृप्त' या कवितेमध्ये कवी म्हणतो वासनेच्या काळया डोहात तृप्तीची घागर भरुन नेलीस पण मी कोरडाच राहिलो. माझी इच्छा पूर्ण झाली नाही. फक्त तुझ्या ओलसर पावलांचे ठसे उमटले माझ्या छातीवर तेही तुला न कळत तेवढीच खूण तुझ्या सहृदयतेची जपून ठेवतो.

'निरोप' या कवितेमध्ये कवीचा आणि पत्नीचा विरह झाला आहे. ते दोघे निरोप घेतात व शेवटी कवी म्हणतो -

"ज - पू - न - रं - हा अडखळले शब्द
मार्ग समोरचा धुक्यात विरला" १२

'मातीमोल जीवन' या कवितेमध्ये कवीचे जीवन मातीमोल झालेले आहे. अंधारमय जीवन कवीच्या ओंजळीत फुले येतात तेव्हा त्या फुलांचे काटे होतात. त्याच्या स्पर्शाने जल आटून फक्त दगडगोटे उरतात. कवीने वर पाहिले की आभाळ फाटते आणि उरतो फक्त अंधार. चालू लागला की रस्त्याला बारा फाटे फुटतात. सगळीकडे काटेकुटे दिसतात. कवीच्या श्वासांनी सोन्याची माती होते आणि हे मातीमोल जीवन सांडू कुठे असे कवी दुःखाने म्हणतो.

'चाललो एकला' या कवितेत एकलेपणाचे दुःख व्यक्त होत आहे. या गडद अंधारात कवी एकटाच जगत आहे. कवी म्हणतो आतडी कातडी वाळून गेली ही कुडी प्राणहीन होईना, फुले गळून गेली तरी मुळ पीर जळून जाईना म्हणून व्यथित होऊन कवी म्हणतो -

"दीप मंदावला
तिमिर दाटला
चाललो एकला
शून्यभावे" १३

'व्यर्थ कासावीस' या कवितेत परमेश्वराशी कवीने संवाद साधला आहे. कवी कासावीस होऊन पायावर तुझ्या मस्तक ठेवले तरी तु लाथा हाणल्यास. प्रसाद घ्यावयाला गर्दीत शिरलो तर तू पाठीवर दिलास छडीचा प्रसाद.

'विरह' ही कविता दोघांच्या विरहाची आहे. येथे विरह जाणवतो. कवी म्हणतो-

"सावली सरावी
रानें विरावी
झरा आटावा
तारा तुटावा
फुल ढळावे
पान गळावे
तुझ्या विरहज्वालेत
मीही जळावे"१४

'सांजवेळ' ही कविता सुध्दा अशीच विरहाची कविता आहे. सखी येत नाही म्हणून विरह होतो. कवी म्हणतो- आकाशाच्या गोकुळात कृष्ण खेळतो रंगखेळ. आता आपली भेटायची वेळ झाली आहे. तरीही ती येत नाही. ती परत जाण्याच्या रस्त्यावर सोन्याची धूळ उडेल आणि शांत नदीकाठी रानवारा घालील शीळ.

'कधी निवतील' या कवितेत कवीने घोर निराशा व्यक्त केली आहे. जळणारी गात्रे कधी निवतील, जाळणारी ही स्वप्ने कधी सरतील, धगधगीत रात्र कधी संपेल. कुठ आहे पहाटवारा आणि अंगाई गीत. हे मन, शरीर हे सारे झाले अधीर. सारं कवीला अधीर भासत आहे. म्हणून कवी म्हणतो-

"सारे भासत आहे बधीर
कोण मला देईल धीर"१५

असा प्रश्न विचारला असला तरी कवीचे मन आस्तिक व श्रध्दाळू आहे. त्याला परमेश्वराचा आधार घ्यावासा वाटतो.

'चुकले पाखरु' या कवितेमध्ये पाखरु चुकले आहे. ते आकाशात हिंडत आहे. पाखराला त्याचे घर सापडेना. त्याची आई त्याच्यासाठी धायधाय रडत आहे. चुकलेल्या पाखराची आई म्हणजे प्रेयसी आहे. येथे विरह झालेला आहे. म्हणून कवी म्हणतो-

"चुकल्या पाखरा
तुझे माझे आसू
क्षणभर हासू
दोघेजण"१६

"जायचे होते खूप दूर' या कवितेत दुःखामुळे कवीला जायचे होते खूप दूर पण रस्ता चुकला आहे. खेत सारे हुकले आहेत. रक्त थिजून, डोळे भिजून, पाऊल उचलेना, ओझे पेलवेना. दरीच्या काठावर कवी एकटा उभा आहे. हे सारे स्वप्नच आहे कवी दुःखात चूरचूर आहे.

'अंधारगाणी" या मध्ये कवी तळ्यात पाणी आहे, मळ्यात गाणी तुझे हात तुझ्या डोळ्यात, तुझ्या गात्रात हिंदळतय गुलाबपाणी. कवीच्या डोळ्यात नुसती अंधाराची गाणी रुतून बसली आहेत.

'वणवा' या कवितेमध्ये कवीच्या आयुष्याचे नंदनवन सर्व दुःखानी वणवा पेटते असे त्याचे जीवन पेटले आहे.

'कित्येकदा' कवितेतही असेच वणव्यासारखे कवीचे दुःख पेटले आहे.

'स्वरुप' या कवितेत कवीचे दुःख असले प्रकट होत असले तरी त्यातून कवी चैतन्याच्या पक्षाने स्वतःचे नवेस्वरुप शोधत आहे.

"डोळे जळुन जातात
अंधार राख उरली
राखेतूनी परी घे
चैतन्य पक्षी उसळी"१७

या गीतामुळेच त्याच्या जीवनाला गती मिळाली आहे.

'शब्दगंध' या कवितेत सुध्दा कवीने आपली वेदना शब्दबुध्द केली आहे. कवी म्हणतो=

"कविता नव्हेच माझी
ही स्निग्ध शांत ज्योत

हिचिया मृदु प्रकाशी
भासे सुरम्य वाट"१८

या प्रकाशाच्या वाटेमुळे उदासवाणी स्वप्ने दूर पळून जातात. दारिद्र्य, दु:खाचा भूते थयथयाट करतात. आनंद राउळाशी हा देह शांत व्हावा शब्दातला सुगंध मागे उरावा.

'अंधार' ही कविता कवीला प्राणामधली प्रकाशाची वाट दाखवणारी आहे. अंधाराच्या कल्लोळात आकाशाची चैतन्यवेल स्पर्शून, गगणाशी भिडून कवीला प्रकाशाची वाट सापडली आहे. म्हणून कवी म्हणतो, -

"अंधाराचे डोही अंधार तरंग
अंधाराचा रंग अंगसंगा
अंगअंग सारे अंधारात भिजे
चैतन्याचे रुजे बीज खोल
चैतन्याचा वेल भिडे गगनाशी
नक्षत्रांच्या राशी पानोपानी
प्राणामाजी आता प्रकाशाचा थाट
माझी मज वाट गवसली"१९

याच गवसलेल्या वाटेवरुन त्यांची कविता कामिनी विहार करु लागली.

'अंधार सलग जिवलग' या कवितेत कवीने अंधाराला शक्ती म्हटले आहे. अंधार हाच कवीचा जिवलग मित्र असून, तोच स्वप्नांत कवी-साठी हसरी निळी पहाट खुलवत असतो आणि अंगाशी बिलगता गुबगुबीत मांजरीसारखा पसरतो अंगावर घनदाट आषाढमेघासारखा सर्वांगात दरवळतो गाभा-यातील धूपासारखा कुरवाळतो. काळोख असताना प्रकाशगर्भ अस्थी बुध्दाच्या स्तूपाप्रमाणे जपून ठेवण्याची शक्ती त्याची कविताच हर देऊ शकते.

'उजाड' या कवितेमध्ये माळ उजाड आहे. सर्वांगावर धूळ वस्त्रमाळ आहे. खुरट्या गवतावर एक चरणारी लंगडी गाय आहे. सर्वत्र कडक उन्हाची साय आहे. आभाळाला भिडू पाहणारा, लोखंडी मनोरा त्याच्या डोक्यावर विजेच्या तारांचे जाळे अंतर्यामात थगधगणारे, काटयांची

पर्वा न करणारे बाभळीचे झाड. पिकल्या फुलातून रिमत उधळणारे या सर्व दृश्यावर कवीचे डोळे खिळतात. येथल्या प्रत्येक वस्तूशी कवीचे नाते जुळलेले आहे. कवीच्या समोरून येणारे हे धूलीचक्र गरगर फिरणारे, अज्ञाताचा प्रवास करणारे. त्यांच्याही मनात परिभ्रमण करणाऱ्या विचारचक्रात त्यांचे मन गिरक्या घेऊन दूरदूर भिरभिरत जाते. आणि वाटते कुठल्या तरी अनोळखी प्रदेशात, निगूढ भावविश्वात ही अनुभूती पाण्यासारखी तरेल धुक्यासारखी ती विरेल ती साकार करण्यासाठी शब्दांचा आधार सापडत नाही. क्षणभर कवी असहाय निराधार सैरभैर मन कसे सावरू शब्दावाचून त्याला कसे आवरू सर्व दुःख विसरून कृतज्ञता व्यक्त करतो, -

"मी विषण्ण, विदीर्ण
शब्दांनो तुमच्यावाचून
माझी व्यथा बोलकी होते
ओलावल्या पापणीतून"२०

अशा या कवितांत कवीने अंधाराचे दुःख जागोजाग व्यक्त केले आहे.

वैशिष्ठ्ये-

राम गोसावींच्या कवितातील अंधाराची दुःखे मनाला विषण्णता दाटून आणणारी आहेत. इतर कवींची दुःखे आणि राम गोसावींचे दुःख आगळेच आहे. दृष्टी गेल्यामुळे जीवनातील एकलेपणाची जाणीव जाणवते. ही त्यांची गीते रसिकांचे मन भडभडून आणणारी आहेत. या गीतांतून लयबध्दता, छंदबध्दता दिसते. त्यांच्या या कविता आत्मलक्षी आहेत. कारण त्यांनी स्वतःचे दुःख डोळे नसल्यामुळे प्रत्येक कवितेतून साकार केले आहे. तरलता, गेयता कवितेत दिसते अंधत्वाचा दारुण अनुभव व्यक्त झाला आहे. दृष्टीहीनतेमुळे त्यांच्या मनाची झालेली कोंडी प्रत्येक कवितेच्या शब्दाशब्दांतून जाणवते. मुक्तछंदाचा वापर आहे. त्यांच्या या कवितांतील दुःखे मनाची पकड घेतात. ही दुःखे कधीही न संपणारी

अशी आहेत. म्हणून त्यांच्या कविता आणि इतर कवींच्या कविता-भेदभाव दिसतो. त्यांच्या कविताने वाचकांचे हृदय भरून येण्यासारख्या आहेत. दृष्टीहीनता हे दु:ख प्रचंड आहे. अवघ्या जीवनाचेच दु:ख आहे. आंधळ्या वेदनेचा भाव या कवितांमध्ये व्यक्त झाला आहे. अशी त्यांच्या शोकगीतांची वैशिष्ठ्ये आहेत.

ब

ब) प्रेमकविता-

'चेतना' 'ओसरले आसू' 'प्रकाशाची किनार' 'सहवास' 'किनारा' 'उन्हे होतात तुझ्या?...' 'वाट' 'आज काय झाले' 'चैत्रोत्सव' 'त्या झुलत्या फांदीखाली' 'उमगले नाही' अशा प्रेमकविता आहेत.

'चेतना' ही कविता पतीपत्नीच्या प्रेमाची आहे. यात कवीचे आणि त्याच्या पत्नीचे प्रेम व्यक्त होते. पत्नीला म्हणतो माझ्या आकाशी तुझाच प्रकाश प्रेमभावनेने घाल. माझ्याच निरंजनाची तूच ज्योत आहेस आणि मांगल्याची आरती गात आहेस कुंभात अमृत ओतून पूर्वजन्मी मी सुकृत केले. माझ्या वेलीचे तूच ग गडे फूल त्यामुळे सुगंधी चाहूल जीवनात येते. त्या फूलाचा सुगंध जीवनात वाहतो. पत्नीच्या एकतारी गोड सूराने अंतरीचे काहूर लोपले आहे. आणि शेवटी म्हणतो,-

"माझ्या कुडीची तूच गे चेतना
राहू तुझ्याविना कैसा मी गे?"२१

असे प्रेम व्यक्त होते.

'ओसरले आसू' ही कविता अशीच पतीपत्नीच्या प्रेमाची आहे. पत्नीला कवी म्हणतो आता ओसरले आसू थोडे हसू. कारण काळोखी क्षितीजावर प्रकाश दिसू लागला आहे. मनाला चिंता, खिन्नता नको, निळा जांभळा डोंगर पुरता उजाडला आहे. सगळीकडे आनंदीआनंद आहे आपण मुक्तछंद गाऊ, दवओली पाखरे गंधधुंद झाली आहेत. आकाश उजळले आहे. प्रकाश पिऊन घे ही मनाला सांजवेळ उदास वाटू देऊ नकोस. येथे उत्कट प्रेम व्यक्त होते.

'प्रकाशाची किनार' या कवितेत सुध्दा असेच पतीपत्नीच्या प्रेमाचे

वर्णन आहे. पत्नीला कवीने प्रकाशाची किनार म्हटले आहे. तिला त्यांचे एवढे प्रचंड दुःख माहित असून पत्नीने त्यांचा संसार सजविला आहे. याची प्रीचती देताना कवी म्हणतो,-

"माझ्या डोळ्यासमोर
गर्द जांभळी तिन्हीसांज
हे सारे ठाऊक असून
सजविलास माझा संसार
माझ्या काळोखी चित्रांना
तुझ्या प्रकाशाची किनार"२२

'सहवास' ही कविता पत्नीच्या सहवासाची आहे. तिचा सहवास कवीला चांगला लाभला आहे. यामध्ये निसर्ग वर्णन सुध्दा आहे. निळसर आभाळ, निळा जांभळा डोंगर, अथांग सुंदर सागर. त्या सागरात निळे पाणी या पाण्यात हासते कमलिनी निळया पाकळी स्वप्ने फुलविते या सहवासाने कवीचे जीवन फुलले आहे. म्हणून कवी म्हणतो,-

"स्वप्न असे हे निळे जांभळे
तुझ्या निरामय सहवासाचे."२३

'किनारा' या कवितेमध्ये पतीपत्नी प्रेम दिसते. पत्नीला कवी किनारा म्हणतो. तिनेच त्यांच्या जीवनाला काठीसारखा आधार दिला आहे. म्हणून कवी म्हणतो,-

"माझ्या जीवनगंगेला
तुझा रम्य किनारा"२४

'उन्हे होतात तुझ्या' या कवितेमध्ये सुध्दा असेच प्रेम प्रकट झाले आहे. पत्नी हे लेणे कवीच्या खोल काळजात उमटलेले आहे.

'वाट' ही कविता प्रियकर प्रेयसीच्या उत्कट प्रेमाची आहे. प्रियकर तिची वाट पहात आहे.

'आज काय झाले' या कवितेमध्ये असेच प्रेम दिसते. या कवितेत प्रेयसी रुसली आहे. तिला मनाचा मोगरा, मनाचे पाखरू, मनाची चांदणी या उपमा दिल्या आहेत. प्रियकर म्हणजे चंद्र आहे.

ती बोलत, हसत नाही म्हणून कवी म्हणतो -

"चंद्र साद घाली
हास गे मोहना
मनाची चांदणी
हसेना, हसेना" २५

'चैत्रोत्सव' या कवितेत प्रियकर प्रेयसी एकमेकांना भेटतात, तेव्हा तो क्षण आनंदाचा असतो. एक प्रकारचा उत्साह असतो. यालाच ते चैत्रोत्सव म्हणतात. येथे उत्कंठ प्रेम दिसून येते.

'त्या झुलत्या फांदीखाली' ही कविता प्रियकराच्या व प्रेयसीच्या पहिल्या भेटीच्या वर्णनाची आहे.

'उमगले नाही' या कवितेत पतीपत्नीच्या पहिल्या रात्रीतील भेटीचे वर्णन आहे. ही भेट पहिलीवहिली आहे. त्या T रात्रीतून कधी उमलली कोमल पहाट हे मिटल्या पापण्यांना कळलेच नाही.

या कवितांतून उत्कंठ प्रेम दिसून येते.

वैशिष्ठ्ये -

राम गोसावी यांच्या जीवनातील काळोखामुळे पतीपत्नी प्रेम जास्तच तरल होते. प्रियकर, प्रेयसी यांचे प्रेम निराळेच आहे. त्यांची दृष्टी गेली तरी पत्नीबद्दल अपार प्रेम व्यक्त होताना दिसते. त्यांच्या प्रेम गीतांना उत्कटतेची लय मिळाली आहे. इतर कवींच्या म्हणजे गडकऱ्यांची प्रेमगीते आणि या कवीची गीते यात फरक आहे. त्यांची गीते मनाला आनंद देणारी आहेत. प्रीतीभावना उचंबळून येते. त्यांच्या गीतात प्रीतीला जास्त महत्व दिले आहे. प्रीती हेच महत्वाचे वैशिष्ठ्य आहे. त्यांच्या प्रत्येक गीतातून पत्नीबद्दल, सखी, प्रेयसीबद्दल अफाट प्रेम ओसडंत आहे. या प्रेमकविता त्यांना चैतन्यशक्ति वाटते. त्यांच्या संवेदनशीलतेने तरल प्रेमभावनेची सारी स्पंदन या प्रेमकवितातून टिपलेली आहेत. प्रेमाचा उत्कंठ साक्षात्कार घडविणारी ही प्रेम कविता म्हणजे

कवीच्या भावजीवनाचा एक सुंदर आलेख म्हणावा लागेल. त्यात उदात्त प्रेमालाच महत्वाचे स्थान मिळालेले असल्याने ती अधिक प्रभावी झाली.

क) निसर्गकविता -

'आषाढाची सर' 'ओढयाच्या काठाशी' 'माझ्या निळ्या अंगणात' 'तिथे त्या तिथे' 'चंद्र असा कललेला' 'कृष्णेच्या घाटावर' या कवितांतून निसर्गाचे सुंदर वर्णन आहे.

'आषाढाची सर' या कवितेत कवीने आषाढी पावसाचे वर्णन केले आहे. हा आषाढी पाऊस मन मोहून टाकतो. या पावसाने सगळी सृष्टी हिरवीगार होते आणि निसर्ग चैतन्यमय फुलतो. या निसर्गामुळे प्रसन्नता येते. सर्व वातावरण खुलून दिसते म्हणून कवी म्हणतो-

"आली आषाढाची सर
जशी लाडकी ही राणी
तिच्यासाठी पारिजात
गुंफतसे फुलवेणी" २६

'ओढयाच्या काठाशी' या कवितेत असेच निसर्ग वर्णन येते. ओढयाच्या काठाशी वाकलेला पिंपळ, त्याची सावली, मखमली हिरवळ, पिंपळाच्या पायाशी झिमलेले मुंगळे, त्यांनी रेखलेले वर्तुळ, खारोटी, आगीचा लोळ, कल्लोळ, सूर्यकिरणांचा रथ, त्यात बसून आलेले निसर्ग-सौंदर्य मोरपिसाऱ्यासारखे खुलून, फुलून राहिलेले आहे. परंतु कवी उदास होऊन म्हणतो -

"भाजला भोवती आगीचा कल्लोळ
पिंपळाखालती निवांत शितळ" २७

'माझ्या निळ्या अंगणात' ही कविता अशीच पावसाच्या वर्णनाची आहे. अंगणात पाऊस पडून पाखरांचा थवा येतो आणि साधा-भोळा मेघ येऊन कानात गूपीत सांगतो. सप्तरंग सोन्याच्या रथातून

येतात. म्हणून कवी म्हणतो -

"सोनियाच्या रथातून
आली कोणाची ग स्वारी" २८

'तिथे त्या तिथे' या कवितेत ओल्या हिरवळीचे, पिवळ्या कण्हेरीचे वर्णन आहे. कवी म्हणतो -

"पिवळ्या कण्हेरीखाली
पाहिली मी फुलपाखरे
तुझ्या डोळ्याती" २९

'चंद्र असा कललेला' या कवितेत निसर्ग वर्णन दिसते. त्यात निसर्गाच्या उपमा दिल्या आहेत. चंद्र असा कललेला, रात्र अशी उष्ण, धुंद निःश्वासाने फुलवेणी सुकलेली ही फुलवेणी म्हणजे, कवी आहे. आसुरलेल्या गात्रातुनि रातराणी फुललेली. ही रातराणी म्हणजे सुद्धा कवीच आहे. परत कवी म्हणतो -

" चंद्र असा कललेला
रात्र अशी झुकलेली
हृदयाची भावकथा
मीलनात सरलेली" ३०

'कृष्णेच्या घाटावर' या कवितेत कृष्णेच्या घाटाचे कवीने वर्णन केले आहे. त्या घाटावर कसे शांत शांत आहे तसा कवी शांत आहे. म्हणून कवी म्हणतो -

"सारे कसे शांत शांत कृष्णेच्या घाटावरती
प्रेममुग्ध मी उभा पहाटेच्या सीमेवरती" ३१

दुःखाच्या व प्रेमाच्या कवितांमध्येही ही निसर्गातील अनेक दृश्य प्रतिमांचा वापर करून कवीने आपले भावविश्व फुलविलेले आढळते.

वैशिष्ट्ये -

या निसर्गकवितांतून आलेली निसर्गवर्णने सुंदर आहेत. त्यातून

निसर्गचित्रे पहायला मिळतात. बालकवींच्या निसर्गकविता पेक्षा राम गोसावींची निसर्गवर्णने मनाला आनंद देतात. गोसावींना दृष्टीचे, निसर्गाचे वेड आहे. निसर्ग हा त्यांचा सोबती आहे. निसर्गावर ते उत्कट प्रेम करतात. दृश्य सानिध्यात त्यांनी विविध काव्यकळ्यांना जन्म दिला. परंतु एकाएकी दृष्टी गेल्यामुळे त्यांना निसर्गापासून थोडे अलिप्त रहावे लागले. या निसर्गकवितांतून कवीने केलेली पावसाची, डोंगराची, पाखरांची वर्णने रसिकांची मने मोहून टाकणारी आणि मनाला आनंद देणारी आहेत.

ड) <u>सामाजिक कविता</u> -

'चौपाटीवर' 'काळे' 'एखादाच' 'शोध' 'मुंबापुरी' 'यात्रा' या कवितांतून समाजाचे चित्र कवीने रेखाटले आहे.

'चौपाटीवर' या कवितेत मुंबईतील चौपाटीचे वर्णन आहे. या चौपाटीवर फिरायला येणाऱ्या माणसांचे वर्णन आहे. ही माणसे आनंदी आहेत. हे सर्व विश्व कवी क्षणभर स्वीकारतो. आंबट, तिखट भेळेची चव घेताना पोरांसारखा पोरं होतो, कोकरासारखा बागडतो. शहाळ्यातले पाणी पिऊन परत टॅक्सीतून फिरताना कवीचे मन जड होते. पिंज-यातल्या पाखरासारखे डोळे ओले चिंब होतात. कवीचे जीवन म्हणजे पिंज-यातल्या पाखरासारखे आहे. स्वत:ला म्हणून कवी पाखर, संबोधतो आणि म्हणतो -

"पिंज-यातल्या पाखराचे डोळे
चिंब चिंब ओले झाले" ३२

'काळे' या कवितेमध्ये कवीने समाजातील माणसांना काळे म्हटले आहे. त्या काळ्यांना धन्यवाद देऊन कवी त्यांचे आभार मानतो. नि:शब्द, भयाण अंधाराचा काळाकुट्ट पडदा टरकावून टाकणारा त्यांचा धारधार असा आवाज कवीसाठी तो एक दीपस्तंभच आहे. खवळलेल्या अंधारलाटांनी भयग्रस्त झालेल्या कवीचा विश्वाशी संबंध तुटलेला असतो.

हे काळे कवीच्या प्रभावी प्राणाला सांगतात, धीर देतात-

"भिऊ नकोस
जवळ आहे किनारा
चैतन्यमय प्रकाशमय किनारा" ३३

'एखादाच' या कवितेत कवीच्या जीवनात अनेक माणसे भेटतात. पण त्यात एखादाच चांगला भेटतो असे प्रकट केले आहे. कवी म्हणतो -

"असे थोडे एखादे आहेत
म्हणून जग आहे जिवंत" ३४

'शोध' या कवितेमध्ये माणसे नैवद्य, धूप, दीप, भजन, पूजन परमेश्वारास करतात. तेव्हा कवीही काळयात काजव्यांची माळ घालून त्या माणसांचा शोध करीत रानोमाळ फिरतो.

'मंबापुरी' या कवितेमध्ये मुंबईतील जीवन म्हणजे खुरटे जीवन असते. मंबापुरीतल्या गर्दीचे वर्णन आहे. तेथील जीवन कर्कश असते. या गर्दीत निरागस बालकाच्या अंगावरून घोडा उधळल्यागत ही माणसे तुडवून जातात. मंबापुरी त्यांना निरागस, निष्पाप बालकाच्या अंगावरून चौखर उधळल्यागत त्या घोडयाने त्याच्या देहाचा व स्वप्नांचा चक्काचूर करावी अशी वाटते.

वैशिष्ठये -

या सामाजिक कवितात समाजातील माणसाचे वर्णन केले आहे. या समाजातील माणसांना कसे वागवले जाते याचे चित्र दिसते. काही वेळेला माणसे चांगली भेटतात. मंबापुरीमध्ये माणसांचा विचार केला जात नाही. या कवितेमध्ये कवी म्हणतो निष्पाप बालकांना तुडविल्यागत माझ्याही देहाचा, स्वप्नांचा या मंबापुरीने चक्काचूर करावा असे कवीला वाटते. सामाजिक प्रश्नांची ही कविता समाज मनावर सहजपणे प्रकाश टाकून जाते. कवीने पाहिलेला समाज त्याच्या काव्याचा विषय न

होता प्रासंगिकताच त्यात अधिक जाणवते.

इ) भक्तिपर कविता -

'काळोखाची नदी' 'हरवले रंग' 'पंढरीचे वारकरी' 'रामजन्म' 'केले नाही मज' 'अगतिक' अशा भक्तिभावनेच्या कविता आहेत.

'काळोखाची नदी' या कवितेत परमेश्वराची आळवणी केलेली दिसते. काळोखाची नदी कवीपुढे दुथडी भरुन वाहत आहे. ती पार करुन प्रकाशाच्या किना-यावर पोचणं शक्य नाही. या वेदना येशू ख्रिस्ताच्या वेदनांहून किंचितभर अधिकच वाटतात म्हणून कवी म्हणतो -

"एका थेंबासाठी
झालो भिकारी
आलो तुझ्या दारी
पांडुरंगा" ३५

'हरवले रंग' मध्ये कवीला परमेश्वराचा आधार घ्यावा वाटतो. त्याच्या जीवनातील प्रकाश हरवला आहे. जीवनात जरी अंधारपर्व आले तरी जीवनाच्या हरवलेल्या चैतन्यमय आणि प्रकाशमय किना-याचा शोध घेणे हा कवीमनाचा ध्यास आहे. आणि तो लिहून जातो -

"हरवले आकार
हरवले प्रकार
दाखवी प्रवकार
चैतन्याचे
हरवल्या दिशा
हरवले आकाश
दाखवी प्रकाश
अंतर्यामी" ३६

'पंढरीचे वारकरी' या कवितेत भक्तीभाव दिसतो. यात विठ्ठल भक्ती आढळते. निसर्गवर्णन आहे. आषाढीतील मेघांची वारी पंढरीला जाते. सावळ्या विठ्ठलाच्या गळ्यात तुळशीच्या माळा आहेत.

या विठ्ठल भक्तीने वीणा रंगली आहे. त्यामुळे आनंद होतो. विठ्ठल-भक्तीमुळे वारकऱ्यांना मोक्षाची शिदोरी मिळते. संसाररूपी सागरातून यशस्वीपणे पैलतिरावर पोहचविणारा तो नावाडी आहे. त या विठ्ठलाचे नाव, ध्यान मनात आठवता त्याच्या भजनात रंगला असता सर्व विश्वाचा विसर पडतो. सर्व प्रकारच्या चिंता आपोआप नाहीशा होतात आणि वारकरी विठ्ठलमय होऊन जातात. वारकरी सांप्रदायाचे विठ्ठल हे आराध्य दैवत आहे.

'रामजन्म' या कवितेमध्ये प्रभु श्रीरामावर कवीची भक्ती दिसते. हा राम सद्विचारी आहे. कवीला भरदुपारी प्रभूच्या दर्शनाची ओढ लागते. तेव्हा पेटत्या उन्हातून चंदेरी पुनव बरसते. कवी म्हणतो -

"अन् लाल गुलालाच्या प्रसन्न धुक्यात
अंतरीच्या कमलकोषात
जन्म घेतात
सद्विचाराचे प्रभु श्रीराम" ३७

'केले नाही मन' या कवितेत कवीने नारायणाचा आधार घेतलेला आहे. कवी म्हणतो मला राउळाचा झेंडा नको करस, पण पालखीचा दांडा तरी तु करावेस असी भक्तीभावना दिसते.

'अगतिक' मध्येही परमेश्वराचा ध्यास घेतला आहे.

वैशिष्ठ्ये -

या कवितांतून श्रद्धाळू मन जाणवते. कवीचे मन आस्तिक आहे. त्याला परमेश्वराचा आधार घ्यावासा वाटतो. हा आधार महत्वाचा वाटतो. जीवनाला व्यापलेल्या आंधळ्या वेदनेचा परमेश्वरी शक्तीशी साधलेला संवाद उत्कट रस घेऊन येतो. आणि भक्तिभावना निर्माण होते.

२) "डोळे" मधील आशयाचे स्वरूप वा व विशेष -

'डोळे' मधील आशयाचे स्वरूप स्पष्ट करताना कवीने सर्व कवितामध्ये अंधाराचे दु:ख जागोजाग व्यतीत केले आहे. दृष्टी गेल्यामुळे मनाची झालेली अवस्था ब-याच कवितातून साकार होते. त्यांची कविता मूळता भावगीत आहे. आणि भेदक अभिव्यक्ती आहे. या कवितातील आशय वेगळा आहे. कवीचे दुबळे मन रात्रंदिवस काळोखात कुडकुडत आहे. लयबद्ध शब्द आशयाचे सौंदर्य वाढवतात. कवीची अचानक दृष्टी गेली आणि नियतीच्या खेळाला सामोरे जावे लागले. त्यामुळे कवी अंधार-विश्वात बुडून गेले. त्यांच्या कवितेचा प्रवाह वेगळया दिशेने वाहू लागला. प्रतिमांना उत्कट स्वरूप प्राप्त झाले. संवेदनशीलतेचा पाझर हळवेपणात प्रकट होऊ लागला. या हळव्या जाणिवेला जगण्याचे नवे सामर्थ्यही प्राप्त झाले.

"अंधाराच्या धैबामध्ये
बसतो कोरीत
भावफुलांची नाजुक लेणी
ऐकू येती
पहाटलेली धूसर गाणी"

अशा पहाटेच्या प्रकाशातली आशावादी लय त्याच्या कवितेचा आशय बनली आहे. या कवितांतून मांजरासारखे ओरबडणारे, पायात घोटाळणारे आणि अखेर जवळ घ्यायला लावून दूध पिणारे 'दु:ख' राम गोसावींनी व्यक्त केले आहे.

श्री. राम गोसावी आपल्या दु:खाकडे तटस्थ वृत्तीने पाहू शकले. म्हणूनच ते समर्थ कविता लिहू शकले. यात मुळीच शंका नाही. सहज प्रवाही प्रासादिक भाषा आणि उत्कट भावाशय, साधी सरळ अभिव्यक्ती आणि मोजक्याच प्रतिमा घेऊन येणारी त्यांची कविता वैशिष्ठपूर्ण वाटते.

अंधाराचे दु:ख त्यांनी शब्दाशब्दांतून व्यक्त केले. परंतु अंधत्वाच्या कल्लोळात त्यांना जीवलग मोरांच्या पिसा-यातील लाख लाख डोळे पहायला मिळतात. तेव्हा त्यांच्या कवितेने आकाशाची चैतन्यवेल स्पर्शून जाण्याचा अनुभव घेतला आणि प्रकाशाची वाट सापडली.

या सापडलेल्या वाटेवरुन त्यांची कविता कामिनी विहार करू लागली. तेव्हा तिला जाणवली प्रकाशाची किनार मनात दरवळला तो शब्दगंध आणि सुचली ती अंधारगाणी. या अंधारगाण्याची त-हा काही वेगळी आहे. त्यात आहे विरहाचे दु:ख, जुन्या स्मृतिची चाहूल, जळणारे हृदय, एकलेपणाची जाणीव, मातीमोल जीवन, हरवलेले रंग आणि काळे स्वत:विषयी असी कवीची व्याकुळ अवस्था पाहायला मिळते. त्यामुळे कवी दु:खी आहे. हे दु:ख वाचकांना सुन्न करुन टाकते.

यातील आशय नेमक्या शब्दात आहे. शब्द, गंध, नाद, मनाला होणा-या संवेदना अगदी टोचणा-या आहेत. दु:खभावना, प्रीतीभावना, निसर्गभावना, भक्तिभावना या कवितांत दिसतात. त्यांच्यातील आशय जास्त दु:खाचाच आहे. आणि कवीची पत्नी-विषयीची कृतज्ञता जास्तीतजास्त तरलपणे टिपली आहे.

३) "डोळे" मधील कवितांचे आकृतिबंध -

राम गोसावी यांच्या कवितांची छंदमय, लयबद्ध अशी रचना आहे. मुक्तछंदाचाही वापर केला आहे. त्यांच्या कवितेची रचना साधी आणि सोपी आहे. आशयधन, प्रतिमांचा वापर काव्यातील आशय उलगडण्यासाठी केला असला तरी त्यामुळे कविता ही दुर्बोध न होता ती सरळ भिडण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे. कवीने कधी कवितेला बंधन घातले नाही. आपल्या स्वत:च्या जीवनात पडसाद उमटतात ते सर्वच कवितेला येऊ शकले नाहीत. स्वानुभवाकडे कविता लिहण्याचा कल असतो. स्वत:ची करुण स्थिती प्रतिमांव्दारे रेखाटली आहे.

त्यांच्या निम्म्या कवितांतून पहिल्या ओळीत कवितेचा शिर्षक आहे आणि काही शेवटच्या ओळीत शिर्षक आहे. काही सलग ओळींच्या कविता आहेत. तर चार चार ओळींची पाच पाच कडवी, तर दोन दोन ओळींची सहा कडवी अशी कवितांची रचना दिसते. अशी मनातील भावनांची वलये पकडणारी साधी, सरळ रचना ते करतात. त्यात भावगीतांचा घाट अधिक असल्याने राम गोसावींना भावकवी म्हणावे लागेल.

मुक्तभावनांचा विलास लयबध्द व तालबध्द शब्दात प्रकट करावयाची ही कवीची धारणा असल्याने रुढ चाकोरीच्या पध्दतीपेक्षा मुक्त रचनेला कवी अधिक प्राधान्य देताना दिसतो. त्यामुळे त्याने यंत्रयुगातील प्रतिमांचा वापर केला आहे. मात्र ही प्रतिमासृष्टी ही भावनावेगाची वाहक बनली आहे.

४) "डोळे" मध्ये मधील भावबंधाचे वैशिष्ठ्य-

अंधत्वाच्या आलेल्या विविध अनुभवाच्या छटा सच्चेपणाने व प्रभावीपणे मांडणारा मराठीतील पहिलाच काव्यसंग्रह आहे. कवीचे भावविश्व आत्मनिष्ठ असल्यामुळे त्याच्या अंधत्वप्रधान जीवनातील अनेक भावतरंग त्याच्या काव्याचे विषय झालेले दिसतात. 'अंधार आणि प्रकाश' 'अंधारातील वाटचालीतली प्रकाशरुप आधार देणारी पत्नी आणि जीवनाला कण देणारी ईश्वरी शक्ती' ह्या तीन वलयात कवीचे सारे भावबंध गुंफलेले दिसतात. त्यामुळे त्याला चैतन्याचा साक्षात्कार होतो.

याबाबतचे विवेचन करताना शीरिष पै म्हणतात,-

"सूर्याच्या दिशेनं झेप घेणारे डोळ्यांतले 'निळे पक्षी' जेव्हा दूर निघून जातात तेव्हा कालजयाचा कवीच्या काळजाला काय वेदना होतात हे जाणून घ्यायचं असेल तर अंध कवी श्री. राम गोसावी ह्यांचे 'डोळे'च डोळ्यांसमोर आणायला हवेत. हळुवार अंत:करणाचा हा भावार्त कवी विझलेल्या डोळ्यांनी 'अंधाराच्या थेंबामध्ये' भावफुलांची नाजुक लेणी खोदीत बसला आहे. अंधाराच्या थेंबामधूनच त्याला पहाटलेली धूसर गाणी ऐकू येतात. काळोखाची नदी त्याच्यापुढं दुथडी भरुन वाहते आहे. ती पार करुन प्रकाशाच्या किनाऱ्यावर पोचणं किती अशक्य आहे हे त्याला समजतं

आणि मग त्या वेदना येशू ख्रिस्ताच्या वेदनांहून तिळभर अधिकच वाटतात. 'हरवले आकार....हरवले प्रकार' अशा स्थितीत मग शेवटी कवीला त्या श्रेष्ठ शक्तीची आठवण येते- जिच्या कृपेमुळे निदान अंतरीची दिव्य दृष्टी तरी आपल्याला लाभेल अशी कवीला खात्री वाटते. आपल्या विझलेल्या स्वप्नांची फुलवात तुझ्या दिव्य स्पर्शाने उजळव अशी आर्त हाक कवीच्या हृदयात जागी होते. भोवतालच्या अंधाराच्या राखेतून त्याच्या चैतन्याचा पक्षी आकाशदिशांचे बंधन तोडून जीवनाचे जयगान गात उंच भरारी घेतो. जीवनाची नवनवी रुपे कवीला दिसू लागतात ती अखेर त्याच्या कवितेमधूनच. आपल्या प्राणातला प्रकाशाचा थाट त्याला जीवनावरच्या प्रेमामुळे आणि त्या दिव्य शक्तीवरील असीम विश्वासामुळे गवसतो. सभोवताली सारा काळोख ... काळोख असताना आपल्या प्रकाशगर्भ अस्थी बुद्धाच्या स्तूपाप्रमाणे जपून ठेवण्याची शक्ती कवी-ला त्याची कविताच देऊ शकते. खरोखर कवितेचा एवढा गौरव मराठी कवितेतून अजून कुणा कवीने केला नसेल. इतके डोळस कवी मराठी कवितेच्या क्षेत्रात निर्मिती करीत असताना प्रकाशाची इतकी दिव्य ओढ राम गोसावी ह्या अंध कवीलाच अशा तीव्रतेने लागावी हा मला मराठी साहित्यातला एक अनाकलनीय चमत्कारच वाटतो."३९

'डोळे' या संग्रहाची समीक्षा करताना नरहर कुरुंदकर लिहितात-

"काळोख आणि निळाईची गुंफण करीत वैफल्य आणि औदासिन यांचे पदर प्रतिभांच्या नाजुक साधनाने उलगडीत या कवितेचा एक प्रवास चालू आहे. स्मरणातून रंग पुरवीत आणि रंग वगळून स्वरगंधातून विश्व अनुभवीत या कवितेचा दुसरा प्रवास चालू आहे. नव्या आशा आणि सुखांना नवी पालवी कुठे फुटते आहे, तर कुठे दु:खच फुलोरा फुलवून कारंजाप्रमाणे नाचत आहे. अशी ही राम गोसावींची कविता आहे. ती इतरांच्यापेक्षा निराळी असूनही तिला स्वत:ची सद्‌धदी आहे. डोळे असणाऱ्यांचे डोळे नुसते भरतच येऊ नयेत तर नवे डोळेही प्राप्त व्हावे अशी किमया करण्याची हौस असणारी ही कविता. तिला मी तिच्या सगळ्या प्रवासात यश चिंतितो.

सबंध व्यक्तिमत्व तळापासून ढवळून टाकणारी आणि मग उध्वस्त करणारी व्यथा ही मोठी चमत्कारिक बाब आहे. जर या व्यथेने तुमचा

संपूर्णपणे ताबा घेतला तर तुम्ही अबोल व स्तब्ध होता. डोळयातील अश्रूच आटून जातात आणि कधी तुम्ही बेभान होऊन आक्रोश करू लागता, हा आक्रोशाचा नाद कलेतील सारे संयमाचे ताण समाप्त करून टाकतो आणि जर या व्यथेवर मात करण्यात तुम्हाला यश आले तर मग तिच्यातील सगळी उत्कटताच समजुतदारपणामुळे मावळून जाते. आपल्याच मनात जळणारे दु:ख आपणच तटस्थपणे पाहिल्याविना व्यथेची कविता होऊ शकत नाही. गोसावींना सतत जे करावे लागते ते हे त्यांना आपलेच दु:ख तटस्थपणे न्याहळून रसिकांच्या मनापर्यंत नेऊन पोचावयाचे आहे."४०

५) 'डोळे' मधील काव्यसौंदर्य-

'डोळे' मधील कवितेतील काव्यसौंदर्य अगदी वाचकाचे हृदय भरून येण्यासारखे आहे. प्रत्येक दु:खाचा, प्रीतीचा अनुभव व्यक्त केला आहे. येथील निसर्गवर्णन सुंदर असल्यामुळे त्यात जास्तच काव्यसौंदर्य खुलते. त्यांच्या काव्यात निसर्ग, भाव, विरह, सौंदर्य, भक्ती यामुळे त्यांचे हे काव्य खुलून दिसते. काव्याच्या ओळी कशा नेमक्यापणाने मांडल्या आहेत.

"काळीज तडफडतंय शब्दरूप व्हायला
प्रेशर कुकरमधल्या वाफेसारखं"४१

किंवा

" एक अभागी उंट
पायाखाली काळे वाळवंट
चहुकडे अंधार वादळे
प्रकाशाचे मृगजळ"४२

"तळयात अंधार
अंधारात तळ
तळयात निळं
मेललं कमळ"४३

या ओळी नेमक्या प्रभावीपणे मांडल्या आहेत. अलंकारीक उपमा मांडल्या आहेत. त्याच्या तडफडणा-या काळजाला कवीने प्रेशर कुकरमधल्या

वाफेची उपमा दिली आहे. आणि शेवाळलेल्या पाण्याला निद्रिस्त तळ्याची उपमा दिली आहे. अशा अनेक प्रतिमांच्या साहयाने कवीने आपले भावविश्व पुढीलप्रमाणे फुलविले आहे.

प्रतिमा-

"आकाशाचं प्रकाशझुंबर कोसळलं खाली
वाटलं - बंद पडलं वीजघर"४४

ही प्रतिमा वापरली आहे. याही पेक्षा सकस प्रतिमा त्यांनी वापरली आहे.

"येशूच, दु:खसुध्दा एक खिळाभर कमी असेल"४५
"मी आता राहतो एका अनोळखी ध्रुवावर"४६
"कधी होतो एस्किमो, बर्फाच्या घरात पुरलेला"४७

याहीपेक्षा अधिक सकस प्रतिमा पुढीलप्रमाणे वापरल्या आहे.

"एखादया अभागी उंटासाठी"४८
"मेलेल्या कमळात
तडफडतोय भुंगा"४९

"काळोखाची नदी
वहाते दुथडी"५०

याहीपेक्षा पुढील प्रतिमा अधिकाधिक सकस वापरल्या आहेत.

"खुरट्या गवतावर चरणारी
एक लंगडी गाय"५१

"आभाळाला भिडू पाहणारा
हा उंच लोखंडी मनोरा"५२

असे त्यांच्या डोळे कवितेतील काव्यसौंदर्य आहे.

५) निष्कर्ष-

'डोळे' या काव्यसंग्रहातील राम गोसावी यांची कबर ही कविता अभ्यासल्यानंतर ती शोकात्म भावगीत आहे. हे प्रथमदर्शनी मनात

भावते. कवीच्या जीवनातील प्रकाशमय काळ आणि अंधत्वानंतरचा अंध:काळ याचे भावविश्व आहे. या भावविश्वाला अधिक तर अंधत्वानंतरच्या भाववृत्तीचेच आवरण लाभलेले आहे.

अंधत्व हे माणसाला कायमचे अंध:कारात लोटून देते. त्यामुळे जीवनाच्या सर्व आशा आकांक्षा लोप पावतात. भावभावना थिजून जातात आणि मग दु:खच दु:ख हे त्याच्या जीवनाचे सूत्र बनते. अशा प्रसंगी अंध: माणसाला दुस-याच्या डोळ्याने जीवन अनुभवावे लागते, जगावे लागते. अशा या जगण्यामध्ये त्याने पाहिलेले निळे, हिरवेगार जग त्याला दुस-याच्या डोळ्याने पहावे लागते. हे निळे पक्षी हरवल्याचे दु:ख 'डोळे' या कवितासंग्रहात प्रथमदर्शनी दिसून येते. अशावेळी येणारे नैराश्य त्यातून येणारा आत्महत्येचा विचार आणि जगायचे कशासाठी यातून होणारे आत्मभान या भाववृत्तीवर 'डोळे' मधील सर्व कविता उभ्या आहेत. त्यात जशा कारुण्यगर्भ भावकविता आहेत तशाच प्रेम, निसर्ग, समाज, राजकारण इ. भाववृत्तींचे पदर घेऊन डोकावतात. मात्र या सर्वांना लपेटून राहते ती अंधत्वातून निर्माण होणारी वेदना.

कवीचे हे भावविश्व अनन्य साधारण आहे. ते रुढ कोणत्याही साच्यात न बसणारे असल्यामुळे कवीने ब-याचवेळेला मुक्तछंदाचा वापर केला. अन्यही भावसदृश्य ताल आणि लयींनी व्यक्त केलेल्या भाववृत्ती भावगीतांच्या आकृतिबंधात सामावून जातात. त्याला कधी ओवींची, अभंगाची तर कधी लयबध्द छंदाची बैठक लाभली आहे. अशा विविध आकृतिबंधाना सौंदर्य प्राप्त करुन दिले. ते या संग्रहातील कवितांमधून डोकावणा-या सुंदर सुंदर प्रतिमासृष्टीने दृश्य प्रतिमांच्या सहाय्याने कवी स्पर्श, नाद आणि गंधाच्या प्रतिमांचा वापर करुन साध्या, सरळ शब्दमाधुर्याने आपल्या कवितेचे सौंदर्य वाढवताना दिसतो.

=====x=====

## xxx संदर्भ टीपा xxx


१) राम गोसावी : 'डांके' काव्यसंग्रह
परचुरे प्रकाशन मंदिर, मेहता भवन गिरगाव
मुंबई. प्रकाशन क्र. ४७१ आवृत्ती पहिली १९७५.
पृ. १

२) तैत्रव : पृ. १
३) तैत्रव पृ. ३
४) तैत्रव पृ. ४
५) तैत्रव पृ. ५
६) तैत्रव पृ. १०
७) तैत्रव पृ. ११
८) तैत्रव पृ. १६
९) तैत्रव पृ. २०
१०) तैत्रव पृ. २४
११) तैत्रव पृ. ३४
१२) तैत्रव पृ. ४१
१३) तैत्रव पृ. ४६
१४) तैत्रव पृ. ४८
१५) तैत्रव पृ. ५०
१६) तैत्रव पृ. ५२
१७) तैत्रव पृ. ६३
१८) तैत्रव पृ. ६०
१९) तैत्रव पृ. ६६
२०) तैत्रव पृ. ६५
२१) तैत्रव पृ. २२
२२) तैत्रव पृ. २५
२३) तैत्रव पृ. २८
२४) तैत्रव पृ. २९
२५) तैत्रव पृ. ३८

२६) तैत्रव पृ.२१
२७) तैत्रव पृ.२६
२८) तैत्रव पृ.२७
२९) तैत्रव पृ.४२
३०) तैत्रव पृ.४३
३१) तैत्रव पृ.४४
३२) तैत्रव पृ.८
३३) तैत्रव पृ.१४
३४) तैत्रव पृ.५१
३५) तैत्रव पृ.७
३६) तैत्रव पृ.१५
३७) तैत्रव पृ.३२
३८) तैत्रव पृ.१०
३९) ह रTम गोसावी 'डोळे' काव्यसंग्रहातील शिरीष पै यांचा लेख
४०) रTम गोसावी : 'अंधारबन'गाव्यसंग्रह
विशाखा प्रकाशन पहिली आवृत्ती १९८०
प्रा.नरहर कुरुंदकरांचा लेख
४१) रTम गोसावी : 'डोळे' काव्यसंग्रह
उ.नि. पृ.१
४२) उ.नि. पृ.४
४३) उ.नि. पृ.५
४४) उ.नि. पृ.१
४५) उ.नि. पृ.१
४६) उ.नि. पृ.२
४७) उ.नि. पृ.२
४८) उ.नि. पृ.४
४९) उ.नि. पृ.५
५०) उ.नि. पृ.७
५१) उ.नि. पृ.६४
५२) उ.नि. पृ.६४

=====x=====